**महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग**

**व्यक्तिगत लाभ योजना निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांकडून घ्यावयाच्या**

**बंधपत्राचा नमुना**

**(शासन निर्णय क्र.राज्ययो-२०१२/प्र.क्र.१५९/पदुम-४,मुंबई दि.३०/१०/२०१५)**

(६/४/२ दुधाळ जनावरांचे गट वाटप योजना)

मी श्री./श्रीमती/कु. -------------------- रा----------------- ता---------------- जिल्हा ---------------- प्रतिज्ञापुर्वक लिहून देतो/देते की, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, ------------------यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या- नाविन्यपुर्ण योजना - ०६/०४/०२ दुधाळ जनावरांचे गट वाटप योजना या योजनेअंतर्गत आज दिनांक --------- रोजी माझे प्रकरण मंजूर झाले असून, मी शासनाने विहीत केलेल्या पध्दतीस अनुसरुन मला लागू असलेल्या ५० टक्के अनुदानावर / ७५ टक्के अनुदानावर (लागू नसेल ते खोडावे ) ०६/०४/०२ दुधाळ जनावरांचा गट खरेदी आणि शासनाने निश्चित केलेल्या आराखडयाप्रमाणे गोठयाचे व चारा शेडचे बांधकाम करेन.

सदर योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या गायी/म्हशीचे योग्य त-हेने पालनपोषण करुन माझ्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांचा उपयोग करेन.

१. योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या गटातील गायी/म्हशी, पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांना पाठपुरावा/ योजना मूल्यांकनासाठी आवश्यक त्या वेळेस उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी माझ्यावर आहे.

२. योजनेअंतर्गत प्राप्त झालेले गायी/म्हशी आजारी पडल्यास अथवा पशुवैद्यकाची गरज पडल्यास नजिकच्या पशुवैद्यकिय दवाखान्यात घेऊन जाईन व त्यांच्या सल्यानुसार उपचार करुन घेईन.

३. योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या गायी/म्हशी ३ वर्षे योग्य रितीने सांभाळणे व त्यापासून व्यवसाय करणे माझेवर बंधनकारक आहे. या दरम्यान विमा काढलेल्या जनावरांचा विम्याचा बिल्ला कानातून पडल्यास त्याबाबत त्वरीत बँक/ विमा कंपनी/पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांना कळविणे माझेवर बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.

४. योजनेअंतर्गत प्राप्त झालेले गाय/म्हैस मृत पावल्यास नजिकच्या पशुवैद्यकिय दवाखान्यास सूचित करुन मृत जनावराचे शवविच्छेदन करुन घेईन व मिळणाऱ्या विमा रकमेतून व गरज पडल्यास अतिरीक्त रक्कम स्वतः उभारुन गाय/म्हैस खरेदी करणे माझेवर बंधनकारक राहील.

५. योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या गायी/म्हशींना साथीच्या रोगापासून संरक्षण मिळण्यासाठी वेळोवेळी लसीकरण करुन घेण्याची जबाबदारी माझ्यावर राहील.

६. योजनेअंतर्गत प्राप्त झालेले गायी/म्हशी, काही कारणाने (असाध्य आरोग्य तक्रार) नाईलाजास्तव विकणे गरजेचे असल्यास पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी यांचे परवानगी शिवाय विकणार नाही.

७. मी महानगरपालिका /नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत/कटकमंडळे या क्षेत्रातील रहिवासी नाही.

८. मला १ मे २००१ नंतर तिसरे हयात अपत्य नाही.

९. माझ्या कुटुंबातील कोणीही व्यक्ती शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक, तसेच राज्य, केंद्र शासन/स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य /पदाधिकारी/लोकप्रतिनिधी नाही.

१०. मला या अथवा तत्सम दुधाळ जनावरांचा गट वाटप / शेळी /मेंढी गट वाटप/ कुक्कुट विषयक योजनांचा मागील तीन वर्षात लाभ मिळालेला नाही.

११. या योजनेमध्ये मला देण्यात आलेल्या ६/४/२ दुधाळ जनावरांचा गट वनक्षेत्रात चराईसाठी सोडणार नाही आणि वन व पर्यावरणाचा -हास होंणार नाही याची मी काळजी घेईन.

१२. माझ्याकडील सर्व गायवर्ग व म्हैसवर्गीय दुधाळ जनावरांची नोंदणी पशुसंवर्धन विभागाकडील इनाफ कार्यक्रमांतर्गत करुन घेईन.

१३. माझ्याकडे असलेल्या प्रजननक्षम गायी-म्हशींना कृत्रिम रेतन करुन घेईन व त्याच्या नोंदी अद्ययावत ठेवेन.

१४. माझ्याकडील एक वर्षावरील सर्व वळू व रेडे यांचे खच्चीकरण करुन घेईन.

१५. माझ्याकडील सर्व गायवर्ग, म्हैसवर्गीय जनावरे तसेच शेळया-मेंढया यांना शासकीय दवाखान्यामार्फत सर्व रोगप्रतिबंधक लसीकरण करुन घेईन व माझ्याकडील जनावरांची आरोग्य पत्रिका अद्ययावत ठेवेन.

१६. विहीत मुदतीत योजना पुर्ण करण्याची जबाबदारी माझी आहे आणि मी ती वेळेत पुर्ण न केल्यास मला दिलेला लाभ रद्द होऊन प्रतिक्षाधीन यादीतील लाभार्थीस सदरचा लाभ दिला जाईल याची मला जाणीव आहे व असे घडल्यास माझी काहीही तक्रार असणार नाही.

**या योजनेबाबत मी अर्जात दिलेली माहिती खरी असून योजनेसंबंधीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. योजनेतील जनावरे परस्पर विक्री केल्यास किंवा प्राप्त झालेल्या अनुदानाचा मी गैर उपयोग केल्याचे आढळून आल्यास माझेवर इंडियन पिनल कोड कलम ४१५ ते ४६४ पैकी लागू होणा-या कलमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची मला पुर्ण जाणीव आहे. तसेच मला दिलेल्या अनुदानाची व्याजासह एकरकमी वसुली, महसुली पध्दतीने करण्यास माझी सहमती आहे.**

साक्षीदाराची स्वाक्षरी, नांव व पुर्ण पत्ता

लाभार्थीची स्वाक्षरी
लाभार्थीचे नांव व पुर्ण पत्ता :

१......................................

२. ...................................

पशुधन विकास अधिकारी (विस्तार)

पंचायत समिती -------- जिल्हा ------------------